शिवछत्रपती क्रीडा संकुल महाळुंगे-बालेवाडी, पुणे येथील क्रीडा प्रबोधिनी (मुले-मुली) वसतीगृहातील इलेक्ट्रिक कामाच्या रु.८१,२२,६०९/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः ई नस्ती-१७९२४६४/क्रीयुसे-१,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :१९/०८/२०२६

वाचा :-

आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र.शिक्रीपी/क्रीप्रवसतिगृह इलेक्ट्रीकल/प्र.मा/२०२३-२४/का.११/२१५५, दि.२८.०७.२०२६

प्रस्तावना:-

शिवछत्रपती क्रीडा संकुल महाळुंगे-बालेवाडी, पुणे येथील क्रीडा प्रबोधिनी (मुले-मुली) वसतीगृहातील इलेक्ट्रिक कामास प्रशासकीय मान्यता देणेबाबत उपरोक्त वाचा येथील पत्रान्वये प्रस्ताव प्राप्त झाला आहे. त्यानुसार शिवछत्रपती क्रीडा संकुल महाळुंगे-बालेवाडी, पुणे येथील क्रीडा प्रबोधिनी (मुले-मुली) वसतीगृहातील इलेक्ट्रिक कामाच्या रु.८१,२२,६०९/- इतक्या किमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णयः-

शिवछत्रपती क्रीडा संकुल महाळुंगे-बालेवाडी, पुणे येथील क्रीडा प्रबोधिनी (मुले-मुली) वसतीगृहातील इलेक्ट्रिक कामाच्या रु.८१,२२,६०९/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यतेसह वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त खर्च "मागणी क्र. ई-३, मुख्य लेखाशिर्ष २२०४-क्रीडा व युवक सेवा, १०४, क्रीडा व खेळ, (१६) (०१) क्रीडा संकुलांची स्थापना (कार्यक्रम), ३१, सहायक अनुदान (वेतनेतर), (२२०४ १७०२)," या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात येईल. या संदर्भात निधी वितरणाची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येईल.

३. हा शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम भाग-२, दिनांक २०/०९/२०१९ चे वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला उपविभाग-पाच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील अ.क्र.३, परिच्छेद क्रमांक १३४ (१), (२) व (३) नुसार प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय दि.०१.१२.२०१६ अन्वये खरेदी धोरण निश्चित करण्यात आले असून त्यामधील तरतुदींनुसार खरेदीसंदर्भातील कार्यवाही करणे आवश्यक राहील.

५. निविदे अगोदर उक्त साहित्याची/कामाची आवश्यकता त्यांचे दर, परिमाणे व विनिर्देशाबाबत आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांनी खात्री करणे बंधनकारक राहील.

६. उक्त कामांमध्ये यापूर्वी प्रशासकीय मान्यता देऊन निधी वितरित केलेल्या कोणत्याही कामाचा समावेश नसल्याची आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांनी खात्री करणे आवश्यक राहील. एकाच कामासाठी दोनदा निधी वितरित / खर्च झाल्यास यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालय जबाबदार राहतील.

७. उक्त कामाची ई-निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कंत्राटदाराची नियुक्ती ज्या रकमेवर करण्यात आलेली त्या रकमेची शासनाकडे मागणी करण्यात यावी.

८. यापूर्वी ज्या कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता प्रदान करून अंदाजपत्रकानुसार निधी वितरित करण्यात आलेला आहे; तथापि, प्रत्यक्षात त्यापेक्षा कमी दरामध्ये कंत्राटदाराची नियुक्ती झालेली असल्यास, अशा प्रकरणांमध्ये उपलब्ध होणारा उर्वरित निधी शासनाची पूर्वमान्यता प्राप्त केल्याशिवाय अन्य कोणत्याही कामासाठी किंवा इतरत्र खर्च करण्यात येऊ नये.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८१९१८४४२१३५४२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ASHOK HANMANLU DAMAYYAWAR

Digitally signed by ASHOK HANMANLU DAMAYYAWAR
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SESD, 2.5.4.20=A72A631BF4E6911D7FAC836DDFB07663FE2C2481CDDF399C406576B02F63BCD8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2CC45C1C1345A8B6FF1E9FDBD2D12C6527F6D070C05B708BCC57B79B7EF3A95D, cn=ASHOK HANMANLU DAMAYYAWAR
Date: 2026.08.19 18:45:03 +05'30'

(अशोक ह. दमय्यावार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव,
४. मा.उपमुख्यमंत्री तथा मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे सचिव,
५. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई यांचे खाजगी सचिव,
६. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई यांचे खाजगी सचिव,
७. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
८. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
९. मा.विरोधी पक्षनेता,विधानसभा / विधानपरिषद, यांचे स्वीय सहायक, मुंबई.
१०. सर्व मा. विधानपरिषद/ विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
११. प्रधान सचिव, क्रीडा विभाग, यांचे स्वीय सहायक.
१२. प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांचे स्वीय सहायक.

१३. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
१५. महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
१६. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी, पुणे.
१७. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे (संचालनालयाद्वारे)
१८. लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१९. कार्यासन अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
२०. निवड नस्ती (क्रीयुसे-१).